

रयत शिक्षण संस्थेचे,

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर

ता. पलूस, जि. सांगली



दि. २७ फेब्रुवारी२०२१

## अहवाल

## मराठी विभाग

## मराठी भाषा गौरव दिन

शनिवार, दिनांक २७ फेब्रुवारी २०२१ रोजी मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून वि. वा. शिरवाडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी साहित्यिकांच्या जीवनावर आधारित तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांच्या हस्ते करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी मराठीतील साहित्यिकांच्या विषयीची माहिती, कविता, ग्रथांतील उतारे, छायाचित्रे, रेखाटनांची भित्तीपत्रके तयार केली होती. कुसुमाग्रज उर्फ वि. वा. शिरवाडकर यांच्यासह ज्ञानपीठ विजेत्या वि. स. खांडेकर, विंदा करंदीकर, भालचंद्र नेमाडे आदी साहित्यिकांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकणारी भित्तीपत्रके यावेळी प्रदर्शित करण्यात आली. यावेळी मराठी विभागाचे प्रमुख प्रा. दिलीप कोने यांनी विद्यार्थ्यांना कुसुमाग्रजांच्या वाङ्मयीन कार्याबद्दल माहिती दिली.

**निष्पत्ती :** विद्यार्थ्यांना मातृभाषेचे महत्त्व समजले. कुसुमाग्रज यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा परिचय झाला.

**लाभार्थी :** महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी





मराठी विभागप्रमुख

प्राचार्य

डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,
रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली

# मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित भित्तिपत्रकाच्या उद्‌घाटन प्रसंगीचे छायाचित्र






